दै. प्रजावाणी दि. 10-12-2023

# व्यापाऱ्यांवर पाळत ठेवून लुटणाऱ्या टोळीतील एकाला ओडीसातून अटक

**• 'एलसीबी'च्या पथकाची कामगिरी • ४ लाख २३ हजाराचा मुद्देमाल जप्त**

नांदेड, दि. ९ : बाहेरच्या राज्यातून येऊन शहरात एखाद्या लॉजवर किंवा घर भाड्याने घेऊन राहिल्यानंतर व्यापाऱ्यावर पाळत ठेऊन सोन्या-चांदीची किंवा पैशाची बॅग लुटणाऱ्या आंतरराज्यीय टोळीतील एका आरोपीस 'एलसीबी'च्या पथकाने 'ओडीसा' येथून ताब्यात घेतले. सदर आरोपीने आपल्या साथीदारासोबत अर्धापूर तसेच सिडको हद्दीतील सोनारांच्या दुकानातून बॅग लिफ्टींग केल्याची कबुली दिली. दरम्यान आरोपीकडून ४ लाख २३ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केल्याची माहिती पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली. अत्यंत किचकट समजल्या जाणाऱ्या दोन्ही गुन्ह्याची उकल करणाऱ्या 'एलसीबी'चे सपोनी रवि वाहुळे व त्यांच्या पथकास २० हजार रुपयांचे बक्षिस यावेळी जाहीर करण्यात आले.

काही दिवसापूर्वी सराफा व्यापाऱ्यांच्या बॅग लिफ्टींगचे प्रकार घडल्याने व्यापाऱ्यात असुरक्षिततेची भावना पसरल्या गेली. अर्धापूर पोलीस स्टेशन तसेच ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत बॅग लिफ्टींगच्या दोन घटना घडल्या होत्या. या दोन्ही ठिकाणी आरोपींची गुन्हा करण्याची पद्धत सारखीच होती, असे सीसीटीव्ही फुटेजच्या तपासावरुन स्पष्ट झाल्यानंतर गुन्हेगार हे परराज्यातील असल्याचे

• पान २ वर

## व्यापाऱ्यांनी सतर्क रहावे-पो. अ. कोकाटे



प्रवास करताना किंवा दुकानावर किंमती वस्तू अथवा पैसे घेऊन जातांना व्यापाऱ्यांनी तसेच प्रवाशांनी सतर्क रहावे. तसेच शहरातील लॉजवर अथवा कोणी रुम किरायाने मागत असेल तर अशा लोकावर लक्ष ठेवावे व काही संशयास्पद वाटल्यास पोलिसांशी संपर्क करण्याचे आवाहन पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले. बॅग लिफ्टिंग करणाऱ्या अशा सात ते आठ टोळ्या असण्याची शक्यता असली तरी त्या पैकी २ टोळ्या निष्पन्न झाल्या आहेत. या टोळ्या अनेक दिवस शहरात राहतात. व्यापाऱ्यांच्या हालचाली टिपून बॅग लंपास करतात. अशा वेळी नागरिकांनी सावधगिरी बाळगणे आवश्यक असल्याचे पो. अ. श्रीकृष्ण कोकाटे म्हणाले.

## व्यापाऱ्यांवर पाळत ठेवून लुटणाऱ्या ...

समोर आले. 'एलसीबी'च्या पथकाने तेलंगणा, ओडीसा तसेच आंध्रप्रदेश राज्यात जाऊन फुटेजच्या आधारे आरोपींची माहिती घेतली असता दोन्ही गुन्ह्यातील आरोपी ट्रेस झाले. तर या टोळीने नांदेड येथे दत्तनगर भागात रुम किरायाने घेऊन व्यापाऱ्यावर पाळत ठेवल्याची माहितीही पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारावर पथकाने ओरीसा राज्यात जाऊन दिपक इसफुल प्रधान (२१, रा. दाहीसाही, मुंडामल, व्यासनगर, जाजपूर रोड, जि. जिजापूर) येथून ताब्यात घेतले.

अर्धापूर आणि सिडको भागात झालेल्या बॅग लिफ्टींगच्या गुन्ह्याबाबत विचारणा केली असता साथीदारासोबत गुन्हा केल्याची कबुली पोलिसांना दिली. दिपक प्रधान या आरोपीकडून ४ लाख २३ हजार रुपयाचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. तर इतर आरोपी निष्पन्न झाल्याची पोलीस अधीक्षकांनी सांगितले. पुढील तपासासाठी आरोपीला ग्रामीण पोलिसांच्या